महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था मआविवि, नाशिक

MAHARASHTRA POST GRADUATE INSTITUTE OF EDUCATION & RESEARCH M.U.H.S.. NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel : (0253) 2997296 Fax (0253) 2539130

Website : www.muhs.ac.in, E-mail : mpgi@muhs.ac.in


जा.क्र.मआविवि/एमपीजीआय/1803/२०२३ दि.08 /१२/२०२३

प्रति,

.......................
.......................
.......................

**दरपत्रक सुचना क्र.:07 /एमपीजीआय/२०२३-२४**

**विषय :- एम.पी.जी.आय.करीता कॉम्पुटर, प्रिंटर, स्कॅनर, प्रोजक्टर भाडेतत्वावर मिळणेबाबात...**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत स्थापन झालेल्या "महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक" करीता खालील तक्त्यात नमुद केलेल्या तांत्रिक तपशिलाप्रमाणे कॉम्पुटर, प्रिंटर, स्कॅनर, प्रोजेक्टर उपकरणे भाडेतत्वावर मिळणे आवश्यक आहे. करीता, विविध पुरवठेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

पुरवठा करावयाच्या उपकरणाचा तांत्रिक तपशिल व संख्या इत्यादींची माहिती खालील तक्त्यात नमुद करण्यात आलेली आहे. विनंती करण्यात येते की "अधिष्ठाता, महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालय, नाशिक आवार, त्र्यंबक रोड, अनंत कान्होरे मैदानासामोर, नाशिक-४२२००१" यांचे नावाने /पत्त्यावर दि.१४ /१२ /२०२३ वेळ दुपारी ४.०० वाजेपावेतो सिलबंद दरपत्रके (तांत्रिक लिफाफा व व्यापारी लिफाफा असे दोन स्वतंत्र लिफाफे एका लिफाफयात घालून)पाठवावित. दरपत्रकाच्या लिफाफ्यावर "एमपीजीआय करीता कॉम्पुटर, प्रिंटर, स्कॅनर, प्रोजेक्टर (भाडेतत्वार) दरपत्रक" असे नमुद करण्यात यावे. शक्य झाल्यास दिनांक दि१४/१२/२०२३ रोजी सायं. ४.१५ वाजता उपस्थित पुरवठेदारांसमोर दरपत्रके उघडण्यात येतील अथवा दरपत्रके उघडण्यासाठीची तारीख व वेळ पुरवठेदारांस दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. दरपत्रकातील दर हे वाहातूकीसह व सर्वकरांसहीत (GST) तसेच महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक या ठिकाणी उपकरणे पोहोच व कार्यन्वित करण्याचे असावेत. दरपत्रकावर आपला जीएसटी क्रमांक व दिनांक नमुद करण्यात यावा.

(कृ.मा.पहावे

## Technical Specification of Computer, Printer, Scanner,Projector

| SR. NO | Equipment's | Technical Specification | Quantity. | Rate | G.S.T | Total Rate |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Computer** | Core i3 6th generation or higher, 4GB RAM, 512 GB HDD inch Monitor | 20 | | | |
| 2 | **Printer** | Monochrome LaserJet Duplex printer, 35 ppm or higher. | 10 | | | |
| 3 | **Scanner** | As per Available in Market ( In working condition) | 10 | | | |
| 4 | **Projector** | As per Available in Market ( In working condition | 10 | | | |

**दरपत्रकाच्या अटी व शर्ती :-**

१. एका पुरवठेदाराचे फक्त एक दरपत्रक स्वीकारण्यात येईल. एकाच पुरवठेदाराने एकापेक्षा जास्त दरपत्रके सादर केल्यास सदर पुरवठेदाराची सर्व दरपत्रके अग्राहय/बाद समजण्यात येतील.

२. दरपत्रकांच्या सिल लिफाफयावर " **कॉम्पुटर, प्रिंटर, स्कॅनर, प्रोजक्टर भाडेत्त्वावर मिळणेबाबत** दरपत्रक असे नमुद करावे तसेच पुरवठादराचे नाव, पत्ता,संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. दरपत्रक स्वातंत्र्य सिलबंद लिफाफ्यात खालील दस्तऐवजांसह स्वप्रमाणिक करुन सादर करणे बंधनकारक आहे

अ) तांत्रिक लिफाफा ब) व्यापारी दरांचा लिफाफा

वरील दोन्ही लिफाफे तिसऱ्या लिफाफ्यात खालुन लिफाफा सिलंबद करावा.

३. दरपत्रासोबत सिलबंद तांत्रिक लिफाफ्यात खालील दस्ताऐवज स्वप्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक आहे

अ) GST नोंदणी प्रमाणप्रत्र

ब) पॅनकार्ड

क) वरील मुद्दा १ नुसार हमीपत्र

ड) दुकान नोंदणी दाखला

४. पुरवठा करावयाच्या उपकरणाचा तांत्रिक तपशिल वर नमुद केलेल्या तक्त्याप्रमाणेच असने आवश्यक आहे.

५. दरपत्रकासोबत जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट परवाना व पॅनकार्ड यांच्या स्वप्रमाणित छायांप्रती सादर करणे बंधनकारक आहे.जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्राशिवाय सादर केलेली दरपत्रके अग्राहय समजण्यात येतील याची नोंद घेण्यात यावी. ज्या पुरवठेदारास जी.एस.टी. लागू नाही, त्यांनी फर्मच्या लेटरहेडवर जी.एस.टी. लागू नसल्याबाबत सही व शिक्क्यासह तसे प्रमाणित करुन द्यावे.

६. पुरवठेदारांनी इतर कोठेही दर नमूद न करता, वर तांत्रिक तपशिलाच्या नमुन्याप्रमाणे आपल्या फर्मच्या लेटर हेडवर, सही व शिक्क्यासह प्रमाणित करुन दर सादर करणे आवश्यक आहे. विहित नमुन्यामध्ये सादर न केलेली दरपत्रके अग्राहय समजण्यात येतील.

७. सदरचे दर हे वस्तूच्या Guaranty / Warranty सह संस्थेत प्रत्यक्ष पोहोच करण्याचे व कार्यान्वित करुन देण्याचे असावेत.

८. दरपत्रकावर रक्कम अंकात व अक्षरात नमुद करण्यात यावी.

९. दरपत्रकात नमुद केलेल्या उपकरणांची नग/संख्यां काही बदल झाल्यास त्याप्रमाणे देयक अदा केले जाईल.

१०. दरपत्रकात पुरवठेदाराने स्वतःच्या कोणत्याही अटी व शर्ती नमूद करु नयेत. अटी व शर्ती नमूद केलेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

११. उक्त उपकरणांचा पुरवठा करण्यासाठी पुरवठेदारास कोणत्याही प्रकारची अग्रीम रक्कम देण्यात येणार नाही.

१२. उपकरणांचा पुरवठा पूर्णपणे व कार्यन्वित करुन दिल्यानंतर उपकरणांचे देयक पुरवठेदाराच्या बँक खात्यात अदा करण्यात येईल.

१३. कोणतेही कारण न देता दरपत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे, तसेच, कोणत्याही स्तरावर संपूर्ण दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेले आहेत.

सदर दरपत्रक सूचना www.mpgi@.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अधिष्ठाता
(अतिरिक्त कार्यभार)